**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा.**

**आदेश क्रमांक- २६० सन २०२४, दिनांक- ०४/०९/२०२४**

पहा:- ०१. जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक २५८/२०२४, दिनांक ०३.०९.२०२४.
०२. सल्लागार समितीचा निर्णय दिनांक १४.१२.२०२३.

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये बुलडाणा न्यायीक जिल्हयाच्या आस्थापनेवरील वाहन चालक, श्री. एस.एस.बोरसे हे दिनांक ३१.०८.२०२४ रोजी शासकीय सेवेतून नियत वयोमान प्राप्तीने सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे रिक्त झालेल्या पदाच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ०२ नुसार सल्लागार समितीच्या निर्णयान्वये पदोन्नती तसेच जिल्हा न्यायालय, बुलडाणा येथील कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कारणास्तव स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | नवीन नियुक्ती व स्थळ |
|---|---|---|
| ०१ | श्री. पी.व्ही.सपकाळ, वाहन चालक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची आस्थापना. | जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. एस.एस.बोरसे यांचे सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदी वाहन चालक म्हणून. |
| ०२ | श्री. एस.एस.बुरकुल, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना. | जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. पी.व्ही.सपकाळ यांचे पदी वाहन चालक म्हणून पदोन्नतीने. |
| # ०३ | श्री. आर.ए.शेळके, उदकी/शिपाई, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, खामगांव यांच न्यायालयात श्री. एस.एस.बुरकुल यांचे पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणून. |
| ०४ | श्री. डी.के.भटकर, बेलिफ, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मलकापुर यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. एस.बी.शिंदे यांचे सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या पदी बेलीफ म्हणून. |

**सदरचा आदेश हा दिनांक ०५/०९/२०२४ रोजीचे मध्यान्हांपूर्व पासुन अंमलात येईल.**

स्थलांतरीत कर्मचाऱ्यांनी आपले पदाचा कार्यभार दिनांक ०४/०९/२०२४ चे मध्यान्हानंतर द्यावा व आपले नुतन पदी, पदग्रहण अवधी न घेता दिनांक ०५/०९/२०२४ चे मध्यान्हांपूर्व रुजू व्हावे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवरील उदकी/शिपाई श्री. आर.ए.शेळके व सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मलकापुर यांचे आस्थापनेवरील बेलिफ श्री. डी.के.भटकर यांची पदे पुढील आदेशापोवेतो रिक्त ठेवण्यात येत आहे. त्यांचे रिक्त पदाचे काम इतर कर्मचा-यांकडुन करुन घेण्यात यावे.

E:\Estt\1\Estt\NJR 1.doc

(#) श्री. आर.ए.शेळके, उदकी/शिपाई यांचे स्थलांतर हे प्रशासकीय कारणास्तव करण्यात येत आहे.

(#) श्री. आर.ए.शेळके, उदकी/शिपाई यांचे स्थलांतर प्रशासकीय कारणास्तव करण्यात येत असल्यामुळे त्यांना प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

पदोन्नत कर्मचारी यांना सुचीत करण्यात येते की, ते विकल्प देण्यास पात्र असतील तर, त्यांनी आपले पदोन्नत पदाचा कार्यभार घेतल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत आपला विकल्प सादर करावा वेळेत न आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही.

पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्याच्या कामामध्ये हलगर्जीपणा तथा निष्काळजीपणा आढळून आल्यास व प्रशासनास आवश्यकता भासल्यास, त्यांचे स्थलांतर इतरत्र कोठेही व केव्हाही होवू शकते, त्यांना "*मी आत्ताच बदलुन आलेलो आहे, माझी बदली पुढील पाच वर्षापर्यंत होवु नये*" असे म्हणण्याचा अधिकार राहणार नाही.

पदोन्नत तसेच स्थलांतरीत कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले पदाचा सविस्तर कार्यभार पिठासीन अधिकारी यांचे मार्फत जिल्हा न्यायालयास सादर करावा.

Digitally signed by SWAPNIL CHANDRAKANT KHATI
Date: 2024.09.04 16:11:44 +0530

(स्वप्नील चं. खटी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

<u>पृष्ठांकन क्रमांक/आस्था./३६६२ /२०२४, दिनांक- ०४.०९.२०२४</u>

<u>प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.</u>

१. जिल्हा न्यायाधीश-१, बुलडाणा.

२. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बुलडाणा / मलकापुर/खामगांव.

३. अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

४. वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

५. संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा, यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

६. कार्यालय प्रत.